माहिती हवीय?

जयश्री फातर्पेकर, गोवा.

□ *बंदिनी* या नावाची मराठी मालिका होती का? या शीर्षकाचे किती चित्रपट प्रदर्शित झाले आहेत? नायक-नायिका दिग्दर्शक कोण?

— *बंदिनी* या नावाची एक मराठी मालिका होती. या नावाचा एकच चित्रपट आतापर्यंत आलाय. १९६३चा बिमल रॉय प्रॉडक्शनचा बंदिनी. विमल रॉय या चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक होते. त्यांनी दिग्दर्शित केलेला हा शेवटचा चित्रपट. अशोककुमार व धर्मेंद्र या चित्रपटाचे नायक होते. नायिका नूतन होती.

विनितकुमार वाझे, तळेगाव, दाभाडे.

□ आजवर किती अभिनेत्रींनी दिग्दर्शनाचा प्रयत्न केलाय?

— नरगीसची आई जद्दनबाई(*हृदय मंथन, मॅडम फॅशन, जीवन सपना, मोती का हार*), प्रोतिमा दासगुप्ता(*छमिया, पगले, झरना*), वीणाकुमारी(*शोहर*), शोभना समर्थ(*हमारी बेटी, छबिली*), ब्रिजरानी(*दामाद*), भानुमती(*चंडीरानी*), लीला चिटणीस(*आज की बात*), साधना(*गीता मेरा नाम*), सुलभा देशपांडे(*राजा रानी को चाहिए पसीना*), शीतल(*हनी*), अपर्णा सेन(*३६ चौरंगी लेन, परमा*), तबसुम(*तुम पर हम कुर्बान*), भानुमती(*इतना जल्दी क्या है*), सिम्मी गरेवाल(*रुखसत*), शुभा खोटे(*चिमुकला पाहुणा*), सुषमा शिरोमणी(*भन्नाट भानू, गुलछडी*), उषा चव्हाण(*गौराचा नवरा, धरपकड*), स्मिता तळवलकर(*सवत माझी लाडकी*), जयश्री गडकर(*सासर माहेर, अशी असावी सासू*), हेमा मालिनी(*दिल आशना है*) या अभिनेत्रींनी आतापर्यंत दिग्दर्शन केलंय.


मिनाक्षी सावंत, गिरगाव, मुंबई.

□ वर्षा उसगावकरने कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या?

— *तुझ्या वाचून करमेना, गंमत जंमत, खट्याळ सासू नाठाळ सून, मज्जाच मज्जा, रेशीमगाठी, सगळीकडे बोंबाबोंब, भूताचा भाऊ, यज्ञ, मालमसाला, नवरा बायको, आत्मविश्वास, पसंत आहे मुलगी, हमाल दे धमाल, अफलातून, आमच्यासारखे आम्हीच, कुठं शोधू मी तुला, घनचक्कर, डोक्याला ताप नाही, पटली रे पटली, बाप रे बाप, शेजारी शेजारी, उपकार दुधाचे, जीवा सखा, मुंबई ते मॉरिशस, येडा की खुळा, एक होता विदूषक, शुभमंगल सावधान, ऐकावं ते नवलच, पैसा पैसा पैसा, लपंडाव, सवत माझी लाडकी, चल गंमत करू, प्रेमाच्या सुलट्या बोंबा, सूडचक्र, जमलं हो जमलं, पैंजण* या मराठी चित्रपटात वर्षाने भूमिका केल्या. *हप्ता बंद, साथी, दूध का कर्ज, परदेसी, शिकारी, हनीमून* यासारख्या काही हिंदी चित्रपटात ती नायिकेच्या भूमिकेत चमकली.

सुधा कोर्टीकर, पंढरपूर.

□ राजश्रीने मराठी चित्रपटात भूमिका केलीय का? तिने नायिकेची भूमिका केलेले चित्रपट कोणते? नायक कोण?



गीत गाया पत्थरोंनेमध्ये जितेंद्र-राजश्री

— राजश्रीने कधीच मराठी चित्रपटात भूमिका केलेली नाही. *गीत गाया पत्थरोंने*(जितेंद्र), *जी चाहता है*(जॉय मुखर्जी), *शहनाई, दो दिल*(विश्वजीत), *जानवर*(शम्मी कपूर), *सगाई*(विश्वजीत), *अराउंड द वर्ल्ड*(राज कपूर), *दिल ने पुकारा*(शशी कपूर), *गुनाहों के देवता*(जितेंद्र), *ब्रह्मचारी*(शम्मी कपूर), *सुहाग रात*(जितेंद्र), *नयना*(शशी कपूर) या हिंदी चित्रपटात ती नायिकेच्या भूमिकेत चमकली.

□ बिंदिया गोस्वामीचा पहिला चित्रपट कोणता?

— *जीवनज्योती* हा बिंदिया गोस्वामीचा पहिला चित्रपट.

मुबारक कबले, सातारा.

□ अमिताभने कोणत्या अभिनेत्रीबरोबर सर्वात अधिक चित्रपटात भूमिका केल्या?

— रेखा. *दो अनजाने, मुकद्दर का सिकंदर, खून पसीना, गंगा की सौगंध, आलाप, मि. नटवरलाल, सुहाग, राम बलराम,* या नऊ चित्रपटात.

नितिनकुमार वाझे, तळेगाव, दाभाडे.

□ दिलीपकुमारने नरगिसबरोबर कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केली? या चित्रपटांचे दिग्दर्शक कोण?

— *अनोखा प्यार*(दिग्दर्शक एम आय. धरमसी), *मेला*(दिग्दर्शक एस. यू. सन्नी), *अंदाज*(दिग्दर्शक मेहबूब), *बाबुल*(दिग्दर्शक एस. यू. सन्नी), *जोगन*(दिग्दर्शक केदार शर्मा), *दीदार*(दिग्दर्शक नितीन बोस), *हलचल*(दिग्दर्शक एस. के. ओझा) या सात चित्रपटात.

प्रज्वला भिंगे, पंढरपूर.

□ रेणुका शहाणेने कोणकोणत्या मराठी-हिंदी चित्रपटात नायिकेची भूमिका केली?

— रेणुका *अबोली* या मराठी चित्रपटात नायिका होती. हिंदीत नायिका बनायचं भाग्य तिला अद्यापि लाभलेलं नाही.

मिलिंद सोहनी, गोरेगाव.

□ शिखा स्वरुप या अभिनेत्रीने कोणकोणत्या चित्रपटात भूमिका केल्या?

— *आवाज दे कहा है, चित्ता* सारख्या एक-दोन चित्रपटात भूमिका केल्यावर ती पडद्याआड गेली.

नारायण फातर्पेकर, बांबोलीम, गोवा.

□ 'चुन के साथ तुम्हारा मांग लिया संसार...' हे गाणं कोणत्या चित्रपटातील नायक-नायिका कोण?

— आपण विचारलेल्या गाण्याचे बोल 'चुन के साथ तुम्हारा मांग लिया संसार...' असे नसून 'मांग के साथ तुम्हारा मैने मांग लिया संसार...' असे आहेत. हे गाणे १९५७च्या *नया दौर*मध्ये होतं. नायक-नायिका दिलीपकुमार-वैजयंतीमाला.

मानसी कोळेकर, ठाणे.

□ अनिल कपूर आणि श्रीदेवी या जोडीचे गाजलेले चित्रपट कोणते?

— *मि. इंडिया, लाडला, रुप की रानी चोरो का राजा, लम्हें, जुदाई* वगैरे.

संगीता वारंग, सासवणे.

□ जितेंद्र-जया भादुरीचा पहिला चित्रपट कोणता?

— *परिचय* या एकाच चित्रपटात ते दोघं एकत्र दिसले होते.